नवराष्ट्र
www.navarashtra.com

# चार क्लब ऑफिसर्स करतील सायबर जागृती



**धुळे,** (वा.) : येथील श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे कै. कर्मवीर पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय धुळे येथील बी.एस.एस्सी (कंप्युटर सायन्स) विभागातील चार विद्यार्थ्यांनी तसेच समन्वयक प्रा.डॉ. स्वाती बोरसे यांनी क्विक हिल फाउंडेशन, विमान नगर, पुणे येथे आयोजित ' सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ' या विशेष प्रशिक्षण सत्रात यशस्वी सहभाग नोंदविला. सायबर सुरक्षा विषयक जनजागृती आणि प्रशिक्षण हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते.

प्राचार्य. डॉ. एम.व्ही.पाटील व प्रा.स्वाती बोरसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभियानासाठी कॉलेजच्या सायबर क्लब ऑफिसर्स म्हणून (प्रेसिडेंट) तेजस्विनी पवार,(सेक्रेटरी) प्रशांत भदाणे, (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर) हेमलता गिरासे,(पी.आर.मेडिया डायरेक्टर) लक्ष्मी शिंपी यांची निवड करण्यात आली. या प्रशिक्षणात क्विक हिल फाऊंडेशनचे प्रमुख मार्गदर्शन अजय शिर्के व गायत्री केसकर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा सुरक्षा, ऑनलाईन फ्रॉड, सोशल मीडियातील धोके, पासवर्ड मॅनेजमेंट आणि डेटा प्रोटेक्शन यांसारख्या मुद्यांवर मार्गदर्शन केले. क्विक हिल कंपनीच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी कैलास काटकर व संजय काटकर यांच्या जीवनाविषयी माहिती दिली.

Jalgaon Plus Edition
Jul 05, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com